# स्त्री जन्म

आवाज न करता, गप्पं बसणे
श्वास न घेता, गुदमरणे
स्वतःच्याच मनाला चुचकारणे
टाकलेल्या  तुकड्यावर जगणे -
कान बंद करून रहाणे
उघड्या डोळ्यांनी ही काही ना बघणे
अंधारात उगाचच चाचपडणे
ठसठसणारे घाव परत परत मोजणे
कुणाचे कसे बोल ऐकणे
अशक्य अशी ओझी पेलणे
कायम ओठ बंद ठेवणे
आतल्या-आत घुसमटणे
परक्यांना आपले म्हणणे
त्यांच्याच साठी झिजणे
चिमुकल्या पावलांत घोटाळणे
त्यांच्याकडे पहात जीवन कंठणे
जन्मभर  होरपळणे
दुःख साहणे
अश्रू ढाळणे
गुन्हाच म्हणायचा -
"स्त्री" म्हणून जन्मणे !!

**- प्रीती देशपांडे**

**http://www.meetipreeti.com/**